गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक २५ वा | मंगळवार ११ जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 25 | Date : 11/06/2024 blow Tuesday Page 4 Price 4

# ज्येष्ठ मंत्र्यांची खाती कायम; कृषी, रेल्वेसह कळीची मंत्रालये भाजपकडेच

## मित्रपक्षांना नागरी विमान वाहतूक, उद्योग खाती




**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा शपथविधी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी, सोमवारी केंद्रीय मंत्रिमंडळाचे खातेवाटप करण्यात आले. अत्यंत महत्त्वाची संरक्षण, अर्थ, गृह आणि परराष्ट्र ही खाती गेल्या सरकारमधील मंत्र्यांकडे कायम राहिली आहेत. नितीन गडकरींकडे सलग तिसऱ्यांदा रस्ते विकास मंत्रालय देण्यात आले असून कृषी, रेल्वे ही महत्त्वाची खाती भाजपने स्वत:कडे ठेवली असून नागरी विमान वाहतूक, उद्योग ही खाती मित्रपक्षांना दिली गेली आहेत.

मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळात राजनाथ सिंह यांच्याकडे संरक्षण, अमित शहा यांच्याकडे गृह व सहकार, निर्मला सीतारामन यांच्याकडे अर्थ आणि एस. जयशंकर यांच्याकडे परराष्ट्र व्यवहार ही दुसऱ्या कार्यकाळातील खाती कायम राहिली आहेत. आघाडीचे सरकार चालवावे लागणार असले तरीही कृषि, रेल्वे, माहिती-तंत्रज्ञान, माहित-प्रसारण, वाणिज्य, आरोग्य, शिक्षण, पेट्रोलियम आदी कळीची मंत्रालये भाजपने स्वत:कडेच ठेवली. घटक पक्षांपैकी जनता दलाचे (ध) एच. डी. कुमारस्वामी यांची कृषी खात्याची मागणी होती. मात्र त्यांना उद्योग व पोलाद मंत्रालय देण्यात आले आहे. तेलगु देसमचे के. राममोहन नायडू यांना यापूर्वी ज्योतिरादित्य शिंदेंकडे असलेले महत्त्वाचे नागरी विमान वाहतूक मंत्रालय देण्यात आले आहे. शिंदे यांच्यावर दूरसंचार खात्याचा भार असेल. वाणिज्य, शिक्षण, पर्यावरण, पेट्रोलियम, बंदर विकास, जहाज बांधणी ही खाती अनुक्रमे पीयुष गोयल, धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, हरदीप पुरी, सर्बानंद सोनोवाल यांच्याकडे कायम ठेवण्यात आली आहेत. लोकसभेत भाजपचे पूर्ण बहुमत नसल्याने संसदीय कार्यमंत्रीपदाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भाजपचे ईशान्येकडील ज्येष्ठ नेते किरेन रिजिजू यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली आहे.

मोदींच्या विश्र्वासातील मानले गेलेले मनसुख मांडविय यांचे आरोग्य खाते काढून त्यांना तुलनेत कमी महत्त्वाचे कामगार कल्याण व रोजगार, युवा-क्रीडा खाते दिले गेले आहे. सी. आर. पाटील पहिल्यांदाच मंत्री बनले असून त्यांच्याकडे मोदींचे लक्ष असलेले जलशक्ती मंत्रालय देण्यात आले आहे. यापूर्वी हे खाते गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे होते. शेखावत यांची पदावन्नती झाली असून त्यांच्याकडे संस्कृती व पर्यटन खाते देण्यात आले आहे. अन्नपूर्णा देवी यांना बढती देण्यात आली असून महिला व बालकल्याण खात्याचे कॅबिनेट मंत्रीपद देण्यात आले आहे. हे खाते पूर्वी स्मृति इराणी सांभाळत होत्या. आरोग्य मंत्रालय पुन्हा जे. पी. नड्डा यांच्याकडे देण्यात आले आहे. भाजप पक्षाध्यक्ष होण्यापूर्वी त्यांनी हेच खाते सांभाळले होते. अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे विधि-कायदा मंत्रालय कायम ठेवले आहे.

कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास ही ग्रामीण भारताच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली तिन्ही खाती मध्य । **पान २ वर**

# हा भटकता आत्मा तुम्हाला, शरद पवारांनी पंतप्रधान मोदींना सुनावले खडे बोल

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाने लोकसभा निवडणुकीत १० जागा लढवल्या होत्या. महाराष्ट्रातल्या या १० जागांमध्ये आठ खासदार निवडून आले आहेत. त्यानंतर शरद पवारांचं प्रचंड कौतुक होतं आहे. ज्या ठिकाणी शरद पवार असतात तिथला स्ट्राईक रेट जास्तच असतो असं वक्तव्य जयंत पाटील यांनी मागच्याच आठवड्यात केलं होतं. त्यानंतर शरद पवार १० जूनच्या पक्षाच्या वर्धापन दिन मेळाव्यात काय बोलणार याची उत्सुकता होती.



निवडणूक निकालांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. पण त्यांना बहुमताची संख्या म्हणजेच २७२ जागा मिळालेल्या नाहीत. एनडीएच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केलं आहे. शरद पवार हे १० जून रोजी होणाऱ्या पक्षाच्या मेळाव्यात काय बोलणार? याची उत्सुकता कायम होती. या मेळाव्यात त्यांनी मोदींचं सरकार लंगडं असल्याचं म्हटलं आहे. तसंच अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांचं भरभरुन कौतुक केलं आहे. एवढंच नाही तर 'भटकता आत्मा' या टीकेवरुन मोदींनाही टोला लगावला आहे.खरं सांगायचं तर निलेश लोकसभेत चालल्यावर मला एका गोष्टीची काळजी आहे, आमचे जे जे जुने सभासद संसदेत आहेत ते मला नक्की विचारतील, हा कोण गडी आणला? मी आज तुम्हाला (निलेश लंके) सांगतोय तिथे शुद्ध मराठीतही भाषण करता येतं. तुम्ही मातृभाषेत बोलू शकता. एकदा माईक हातात आला की निलेश लंके मराठीत काय बोलतील याचा भरवसा नाही.

राजकीय पक्ष म्हणून आम्ही एकमेकांवर टीका करतो. पण टीका करताना आम्ही मर्यादा ठेवतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी माझ्याबाबत काय बोलले? की भटकती आत्मा. माझ्याबद्दल त्यांनी उल्लेख केला की, हा भटकता आत्मा आहे. एका दृष्टीने हे बरं झालं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आत्मा हा कायम राहतो. हा कायम राहणारा आत्मा तुम्हाला सोडणार नाही. कारण तो कायम त्या ठिकाणी राहणार आहे, असा घणाघात शरद पवार यांनी केला.

मोदींनी शिवसेनाबाबत उल्लेख केला की, बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेनेची निर्मिती केली. त्यांनी राज्य केलं. मराठी माणसाचा आत्मविश्र्वास वाढला. त्यांचा उल्लेख करताना ही नकली बापाची संघटना? हे बोलणं काही शोभतं? एखाद्या संस्थेला, एखाद्या व्यक्तीला आणि व्यक्ती समूहाला त्यांची पार्श्र्वभूमी नकली आहे हे पंतप्रधानांनी बोलायचं? याचा अर्थ हा आहे की, त्यांना तारतम्य राहिलेलं नाही. सत्ता हातात येते, त्या सत्तेचं समर्थन करणं, त्यामुळे सत्ता मिळायची शक्यता नसली तर माणूस बेफाम आणि अस्वस्थ कसा होतो त्याप्रकारची त्यांची स्थिती झाली, अशी टीका शरद पवारांनी केली.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकसभेच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात १८ सभा घेतल्या. त्यातल्या पुण्यातल्या सभेत अजित पवार मंचावर असताना नरेंद्र मोदींनी शरद पवारांचा उल्लेख भटकता आत्मा असा केला होता. त्यावरुन पंतप्रधान मोदींवर बरीच टीका झाली होती. शरद पवारांनी त्यावेळीही त्यांना उत्तर दिलं होतं. तसंच आता वर्धापन दिनाच्या मेळाव्यातही उत्तर दिलं आहे.

# निवृत्ती वेतनधारकांना फोन कॉल्स व संदेशापासून सावधानता बाळगण्याचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी:** सोलापूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या अधिनस्त सर्व निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्ती वेतनधारक व कार्यरत कर्मचारी यांनी फसव्या फोन कॉल्स व संदेशापासून सावधानता बाळगावी, असे आवाहन कोषागार अधिकारी (निवृत्ती वेतन) रणजित कदम यांनी केले आहे.

जिल्हा कोषागार कार्यालयाकडून निवृत्ती वेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर सर्व लाभ प्रदान करण्यात येतात. सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुली किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमेबाबत कोषागार कार्यालया मार्फत फोन करून संपर्क साधला जात नाही. किंवा ऑनलाइन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांनी फसव्या फोन कॉल्स व संदेशापासून सावधानता बाळगावी. अशा प्रकारच्या फसव्या ऑनलाइन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे भरण्याबाबत दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरून आलेल्या कॉल्स किंवा संदेशाला प्रतिसाद देऊ नये. याबाबत निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्ती वेतनधारकांची वैयक्तिक जवाबदारी राहील, याची नोंद घ्यावी. कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमत: कोषागार कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कोषागार अधिकारी (निवृत्ती वेतन) रणजित कदम यांनी केले आहे.

# महेश इंगळे यांच्या पत्नी कै.सौ.रुपाली इंगळे यांचे पुण्यात उपचारादरम्यान निधन



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज :** येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या सुविद्य पत्नी कै.सौ.रुपाली इंगळे यांचे आज सायंकाळी ४:३० वाजता दीर्घ आजाराने पुण्यातील जहांगीर रुग्णालयात दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या मंगळवार दिनांक ११/६/२०२४ रोजी सकाळी ८ वाजता मानकरी वाडा, धाकटीवेस, मुरलीधर मंदिर शेजारी येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान कर्मचारी सेवेकरी यांच्या वतीने श्री.स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना.

# प्रज्वल रेवण्णाला २४ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बलात्कार प्रकरणातील आरोपी प्रज्वल रेवण्णाला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तसेच त्याची रवानगी २४ जूनपर्यंत बंगळुरू सेंट्रल तुरुंगात करण्यात आली आहे. कर्नाटकमधील सेक्स टेप प्रकरणात रेवण्णावर बलात्काराचे तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी एका प्रकरणात ही कोठडी सुनावण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे इतर दोन प्रकरणात रेवण्णाने अंतरिम जामिनासाठी अर्ज केला आहे. मात्र, दोन्ही प्रकरणावरील सुनावणी अद्याप बाकी आहे.

जवळपास महिन्याभरापूर्वी कर्नाटकमधील मतदानानंतर हे सगळं प्रकरण उघड आलं होतं. प्रज्वल रेवण्णावर महिलांचं लैंगिक शोषण केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्याचे व्हिडीओदेखील बाहेर आले होते. प्रज्वल रेवण्णाच्या ड्रायव्हरनंच या सगळ्या क्लिप असणारा पेनड्राईव्ह पोलिसांच्या हवाली केला होता. त्यानंतर पोलिसांनी प्रज्वल रेवण्णाचा शोध सुरू केला. मात्र, तोपर्यंत तो विदेशात फरार झाल्याचं पुढे आलं होते. त्याचा कोणताही ठावठिकाणा लागत नव्हता.हे प्रकरण प्रकरण देशभरात पसरल्यानंतर कर्नाटक सरकारने याच्या तपासासाठी एसआयटी स्थापन केली होती. तसेच त्याच्या विरोधात गुन्हादेखील दाखल करण्यात आला होता.

इतकंच नाही, तर एसआयटीने सीबीआयमार्फत इंटरपोलला रेवण्णांचा ठावठिकाणा शोधण्याची विनंती केली होती. त्यानुसार प्रज्वल रेवण्णावर जर्मनीमध्ये असल्याचे पुढे आले होतं.


# महाराजस्व अभियानातंर्गत विविध दाखल्यांसाठी शिबीराचे आयोजन

**सोलापूर/प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक असलेले जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, आर्थिक दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर तसेच इतर शैक्षणिक दाखल्यांसाठी महाराजस्व अभियानांतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागात दिनांक ११ ते १४ जून २०२४ या कालावधीत दाखल्या विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार किरण जमदाडे यांनी दिली आहे.दक्षिण सोलापूर तालुक्यात महाराजस्व अभियानांतर्गत चार ठिकाणी शिबीराचे आयोजन केले असुन, दिनांक ११ ते १२ जून २०२४ रोजी एस.व्ही.सी.एस. बोरामणी, शंकरलिंग प्रशाला, वळसंग , कोनापूरे प्रशाला, आहेरवाडी तसेच दिनांक १३ ते १४ जून २०२४ रोजी सोनटक्के प्रशाला, तांदुळवाडी या ठिकाणी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत होणार आहे. या शिबीरासाठी ०१ नायब तहसिलदार, ०४ मंडळ अधिकारी, १८ तलाठी, ०१ कार्यालयीन कर्मचारी तसेच २५ महा ई सेवा- केंद्रचालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या शिबीरास जास्तीत-जास्त नागरिकांनी उपस्थित राहून, आवश्यक शैक्षणिक दाखले प्राप्त करुन घ्यावेत असे आवाहनही तहसिलदार किरण जमदाडे यांनी केले आहे.

# वारकऱ्यांना पाणी, स्वच्छता, आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यासह सुरक्षेची काळजी घ्या : जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**



जिल्ह्यात वेळेत पाऊस सुरू झाल्याचे पाहता पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता असून वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, वाहतूक, रस्ता सुरक्षा, आरोग्य सुविधा पुरविण्यासह त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी सर्व विभागांनी योग्य समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

पालखी सोहळा सुरक्षित व्हावा यासाठी सर्व संबंधित तालुक्यांनी इन्सीडन्स रिस्पॉन्स सिस्टीमचा (आयआरएस) प्रभावी उपयोग करावा. सोहळ्यातील संबंधित विभागविषयक निश्र्चित कामकाजासाठी संपर्क अधिकारी नेमून त्याला पालखी सोहळयासंबंधित जबाबदारी द्यावी जेणेकरुन समन्वय साधताना गोंधळ होणार नाही.

पाऊस पडत असल्याचे लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्याचे स्रोत तपासून ते निर्जंतूक करुन घ्यावेत. पाणीपुरवठ्यासाठी आवश्यकता असल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून पाणी मिळेल यासाठी प्रयत्न करता येतील. पाणीपुरवठ्याचे टँकर आणि शौचालयांच्या संख्येत वाढ करण्यासाठी पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड मनपा तसेच स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी.तात्पुरत्या शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. पुढील गावी शौचालयांच्या वाहतुकीसाठी योग्य वाहतूक आराखडा (ट्रान्झिट प्लॅन) तयार करा. आपल्या घरातील शौचालये वारकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यास पालखी मार्गावरील इच्छुक नागरिकांच्या घरांना वेगळे मार्किंग करा. वारी पुढे गेल्यानंतर मागील गावातील स्वच्छतेवर विशेष भर द्यावा, असेही ते म्हणाले. पालखी मार्गावरील दवाखान्यांमध्ये औषधे उपलब्ध ठेवावीत. पालखीच्या रस्त्यावर कोठे अतिक्रमणे । **पान २ वर**

## संपादकीय

# जनतेचा निर्णय..

इथे बेबंद हुकूमशाही स्थापन करणे, हे संघ परिवाराचे ध्येय आहे. मात्र, ते या देशात यशस्वी होणार नाही, हे समोर मांडणारा निर्देश म्हणजे हा निकाल असल्याचेही आपण म्हणू शकतो. लोकसभेच्या महाराष्ट्रातील निकालाकडे बघताना संख्येच्या पलीकडे जाऊन गुणात्मक निष्कर्ष अभ्यासणे गरजेचे आहे. या निकालांचा धावता आढावा घेत असताना काही मुद्दे प्रकर्षाने तसेच आग्रहाने मांडावेसे वाटतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे धर्माच्या आधारे जनतेमध्ये फूट पाडण्याच्या आणि धार्मिक ध्रुवीकरण करण्याच्या नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या विचारांना जनतेने नाकारलेले आहे. जनतेने मतांच्या माध्यमातून त्याविरोधात दिलेली ही संतप्त प्रतिक्रिया आहे, असेही आपण म्हणू शकतो. त्यांनी निवडणूक प्रचारामध्येच नव्हे तर मागील दहा वर्षांच्या कार्यकाळामध्ये याच धर्मवादी मतांचा पाठपुरावा केला. निवडणूक प्रचारात तर त्यांचे हे विचार उसळी मारून बाहेर पडत होते. त्या सगळ्या चुकीच्या राजकारणावरील प्रतिक्रिया म्हणजे हा निकाल आहे. रिवाजाप्रमाणे यंदाही निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर संभाव्य निकाल जाहीर करण्यात आले. काही 'पंडितांनी' तावातावाने ते मांडले. मात्र, राहुल गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे ती केवळ मोदी मीडियाने निर्माण केलेली वातावरणनिर्मिती होती. विविध यंत्रणांवर दबाव निर्माण करण्यासाठी वापरलेली ही नीती होती. मात्र, ताजा निकाल त्यातील बोगसपणाही दाखवून जातो. निकालांबाबत माध्यमांमध्ये इंडिया आघाडी आणि एनडीएसंदर्भात वेगवेगळी भाकिते वर्तवण्यात आली होती. मात्र, आता ती सगळी फोल ठरल्याचे चित्र समोर आहे. ही बाबही असे तर्क मांडणारे माध्यमकर्मी किती एकांगी भूमिका घेतात, हे दाखवून देणारी आहे. माध्यमकर्मी देखील किती प्रभावाखाली वा दडपणाखाली व्यक्त होतात, हेही आता स्पष्टपणे दिसून आले आहे. राज्यवार विचार करायचा तर उत्तर प्रदेशमध्ये भाजपसाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथील गुणोत्तर ६०- ४० असे आहे. ही स्थिती भाजपसाठी समाधानकारक नाही.कारण हेच प्रमाण आधी ८०-२० असे राहिले आहे. भाजपला त्या राज्यात ७२ जागा होत्या. त्या तुलनेत या राज्यात आता ३० जागा कमी झाल्या आहेत. या राज्यातच अतिभव्य असे राम मंदिर उभे राहिले. इथेच त्यांनी काशीविश्वेश्वर मंदिराच्या रूपाने आगामी दंगलींची तयारी करून ठेवली. मात्र, ताज्या निकालाच्या माध्यमातून तेथील जनतेने या धार्मिक राजकारणाला पूर्णपणे नाकारले आहे.

पान १ वरुन

## वारकऱ्यांना पाणी, स्वच्छता, ..

असल्यास ती तात्काळ काढून टाकण्यात यावीत. सुरक्षेच्यादृष्टीने मार्गावरील, नगरपालिका हद्दीतील सर्व जाहिरात फलकांची (होर्डिंग्ज) तपासणी करावी. अवैध आणि असुरक्षित सर्व जाहिरात फलक काढून टाकावेत. पालखीला अडथळा येऊ नये आणि वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पालखी महामार्गावरील कामे पूर्ण करण्यासह अडथळे काढावेत. एनएचएआयने पोलीस, उपविभागीय अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करुन त्यानुसार आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही ते म्हणाले.

अन्न व औषध प्रशासन विभागाने मार्गावरील सर्व हॉटेल्समधील खाद्यपदार्थांची नियमित तपासणी करत रहावे. त्रुटी आढळलेल्या ठिकाणी कठोर कारवाई, प्रसंगी अनुज्ञप्ती रद्द करा. आपत्कालीन व्यवस्थेसाठी आळंदी येथे एनडीआरएफ तसेच इतरत्र गृहरक्षक दलाच्या जवानांची आपदा मित्रांची मदत घ्या. रात्री गरजेच्या ठिकाणी मोठी प्रकाशव्यवस्था करण्यासाठी नगरपालिकेकडील लायटिंग टॉवरचा उपयोग करावा, असेही ते म्हणाले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पाटील यांनी पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा आदींबाबत माहिती सादरीकरणाद्वारे दिली. संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखीसाठी १ हजार ५००, संत तुकाराम महाराज पालखीसाठी १ हजार आणि संत सोपान महाराज पालखीसाठी पालखीमुक्कामी, विसाव्याच्या ठिकाणी २०० शौचालयांची उभारणी करण्यात येणार आहे. तिन्ही पालख्यांसाठी मिळून १२ तात्पुरती निवारा केंद्रे उभारण्यात येणार आहेत. पाण्याचे स्रोत, वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, फिरते आरोग्य पथक, औषधे, रुग्णवाहिका यांची आवश्यक ती व्यवस्था करण्यात येणार आहे. स्तनदा माता आणि बालकांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

पालखी तळाचे सपाटीकरण, इंधन आणि वीज पुरवठा, शोषखड्डे, तात्पुरता निवारा केंद्र, आरोग्य किट आदींची माहिती यावेळी देण्यात आली. १४० रुग्णवाहिका आणि ५७ रुग्णवाहिका पथक, ११२ वैद्यकीय अधिकारी, ३३६ आरोग्य अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी २०० टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे, असेही यावेळी श्री. पाटील यांनी सांगितले. पालखीसाठी तसेच पोलीसांसाठी तालुकास्तरावर देण्यात आलेले तात्पुरते तंबू (टेन्ट्स) देण्यात यावेत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

पोलीस अधीक्षक श्री. देशमुख यांनी पालखी बंदोबस्त, वाहतूक आराखडा, पालखी महामार्गावर एनएचएआयकडून सुरू असलेल्या कामांच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या उपाययोजना आदींच्या अनुषंगाने माहिती दिली आणि संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.इंद्रायणी नदीतील जलपर्णी काढणे, प्रदुषित पाणी वाहून जावे यासाठी धरणातून पाणी सोडणे, पालखी प्रस्थानावेळी उपस्थितीसाठी आळंदी येथे मंदिरात मर्यादित स्वरुपात मंदिर समितीकडून पासेस देणे तसेच प्रस्थानाच्या दिवशी वाहनांना अत्यावश्यक सेवेतील वाहनांशिवाय अन्य वाहनांना प्रवेशबंदी आदींच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीस सहायक जिल्हाधिकारी डॉ. पूजा मनोरमा दिलीप खेडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, संबंधित उपविभागांचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महानगरपालिका, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, आरोग्य विभाग, पोलीस, अग्निशमन विभाग, पशुसंवर्धन विभाग, प्रदुषण नियंत्रण मंडळ, अन्न व औषध प्रशासन, महावितरण, परिवहन विभाग, राज्य मार्ग परिवहन महामंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# कोण रामदास आठवले ?



कोण रामदास आठवले? असा प्रश्न जेंव्हा दुधाचे दात ही न पडलेली मुले विचारतात तेंव्हा खूप आश्र्चर्य वाटते.आज आपण जे बोलतो ,त्यासाठी जे मैदान इतर सहकारी यांच्या सहकार्याने तयार करून ठेवले ,ते रामदास आठवले.अगळगाव ,सांगली हे त्यांचे गावगावी अतिशय प्रतिकूल परिस्थती.पोट भरण्याचे वांदे तिथे शिक्षण कुठून घेणार?पण शिक्षणाच्या जिद्दीने मुंबईत आलेले रामदास आठवले.ज वि पवार, राजा ढाले,नामदेव ढसाळ,अविनाश महातेकर यांच्या पँथर प्रेमात अडकले.आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष करून पँथरच्या आंदोलनात सक्रिय झाले.ते रामदास आठवलेपँथरचे आंदोलन एक सामाजिक चळवळ होती.जशी आजही खेड्यापाड्यात दलित वस्तीत सवर्ण आपला रुबाब दाखवतात.दलितांवर हल्ले करतात,दलित स्त्री वर बलात्कार करतात.तसे त्या काळातही होत होते.ते हल्ले थांबवण्यासाठी.दलितांचे आत्मभान जागृत करण्यासाठी २९ मे १९७२ रोजी स्थापन झालेली पँथर .याच पँथरचे सक्रिय सदस्य होते रामदास आठवले.

पँथरने खेड्यापाड्यातील दलितांना न्याय मिळवून दिला.सामाजिक अन्याय ते वयक्तिक अन्याय ,यावर पँथर तुटून पडत होती. त्यात सहभागी होते ते रामदास आठवले.

सिद्धार्थ हॉस्टेल मधील आपल्या खोलीत अभ्यास करण्या ऐवजी राजकीय बैठका रंगवत ते रामदास आठवले

आपल्या कुटुंबाला आपली गरज आहे आपले कुटुंब गरीब आहे, शिकलो तर सरकारी नोकरी लागेल आणि आईवडिलांचे कर्ज फेडता येईल ,ही समज असूनही आई वडिलांपेक्षा समाजाचे आपण खूप मोठे देणे लागतो.म्हणून समाज घटकाचे ऋण फेडण्यासाठी समाजसेवेत उतरले तर रामदास आठवले

पँथरच्या चळवळीत अगदी गुजरात पासून दिल्ली पंजाब पर्यंत थडकलेले जे वादळ होते.त्या वादळाचा एक भाग होते रामदास आठवले.पँथरच्या माध्यमातून अनेक ठिकाणी मोर्चे काढले गेले.अनेक गावांत जाऊन तेथील सवर्णांवर जरब बसवली दलितांना न्याय मिळवून दिला गेला.७ मार्च १९७७ ला पँथर वयक्तिक कारणामुळे बरखास्त झाली.त्यानंतर लगेचच , भारतीय दलित पँथर स्थापन केली गेली.त्या संघटनेचे संस्थापक सदस्य होते. रामदास आठवले.

भारतीय दलित पँथर प्रा अरुण कांबळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर आंदोलन करत होती. पँथरचेच काम अतिशय जोमाने करत होती. प्रा अरुण कांबळे नंतर अध्यक्ष झाले ते होते रामदास आठवले.

१९७९ ला मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' नाव मिळावे म्हणून जो लाँग मार्च काढला गेला त्यात अनेक संघटना होत्या पण महत्वाची भूमिका आणि संख्या होती ती भारतीय दलित पँथरची .लाँग मार्चमध्ये जहाल भाषणे केली ,ते होते रामदास आठवले..

'रिडल्स इन हिंदुईझम' या बाबासाहेबांच्या पुस्तकावर बंदी आणण्यासाठी हिंदुत्ववादी संघटनेने जो मोर्चा काढला. त्याला प्रत्युत्तर म्हणून आंबेडकरी जनतेने काढलेला रिडल्सचा लाखोंचा मोर्चा,त्या मोर्चाचे अनेक नेत्यांसोबत नेतृत्व करणारे एक नेते होते,रामदास आठवले.

पँथरने राबवलेल्या प्रत्येक आंदोलनाचे साक्षीदार होते रामदास आठवले. मग ते भूमीहिनांचे आंदोलन असो, बौद्धांच्या सवलती मिळवण्यासाठीचे आंदोलन असो, धर्मांतराची चळवळ असो,,दलितांना आत्मभान मिळवून देण्यासाठीचे आंदोलन असो, नामांतराची लढाई असो, रिडल्सचा जागतिक विक्रम असो,गुजरातचे आरक्षण विरोधी आंदोलन असो,की मंडळ आयोग आंदोलन असो ,या सगळ्यांचे साक्षीदारच नाही तर नेतृत्व करणारे आहेत रामदास आठवले.जागतिक बौद्ध संघटनेत जेथे अनेक देश सहभागी आहेत त्या संघटनेचे उपाध्यक्ष आहेत रामदास आठवले.

जॉर्ज फर्नांडिस हे जहाल व्यक्तिमत्व जेंव्हा अंथरुणावर खिळले तेंव्हा आपला उत्तराधिकारी बनवून आपल्या रेल्वे संघटनेचे अध्यक्ष ज्यांना बहाल केले ते आहेत रामदास आठवले.

: बामसेफ आणि बीएसपी सारख्या संघटना त्याच बरोबर आणखी काही संघटना या माई साहेब आंबेडकर यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे खुनी ठरवत होते तेंव्हा माईसाहेबांची बाजू घेऊन त्यांना खंबीर पाठिंबा देणारे माई साहेबानी ज्यांना माणसपुत्र मानले, माईसाहेबांची शेवटपर्यंत पोटच्या मुलाप्रमाणे सेवा केली ,ते आहेत रामदास आठवले.

समाजहितासाठी सतत पायाला भिंगरी बांधून संपूर्ण देशातच नाही तर विदेशात सुद्धा फिरत असतात.आपल्या समाजाला काही देता येईल का?हाच विचार सतत मनात असतो.

सकाळी दिल्ली तर संध्याकाळी मुंबई,आज सकाळी सोलापूर तर रात्री मराठवाडा, संपूर्ण देशभर संघटनेचे काम करत फिरत असतात।घरी कमी तर बाहेरच जास्त असतात.कुटुंबाचा वेळ समाजाला देणारे,कुटुंबाच्या शिव्या समाजासाठी खाणारे, रामदास आठवले.

दलित समाजातील मोठा घटक आपल्या कर्तृत्वाने आपल्या सोबत ठेवणारे ,आणि त्यांच्यासाठी आंदोलने उभारणारे रामदास आठवले,

विध्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीपासून तर अधिकाऱ्यांच्या पदोन्नती पर्यंत सर्व क्षेत्रात लढा देणारे, रामदास आठवले.

नेत्यांनी पांढरेच कडक कपडे घातले पाहिजेत,या गोष्टीला फाटा देऊन रंगीत चट्ट्या पट्ट्याचे ड्रेस घालून नवीन पायंडा पाडून तरुणांच्या गळ्यातील ताईत झालेले,आपली नवी ओळख निर्माण केली,ते रामदास आठवले.

६ डिसेंम्बर रोजी ज्यांची सभा ऐकण्यासाठी महाराष्ट्रातून आणि महाराष्ट्राबाहेरून हजारोंच्या संख्येने गर्दी करणारे ,शिवाजी मैदान भरून टाकणारे नेते म्हणजे रामदास आठवले.

महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात आणि विदेशात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे नेते म्हणजे रामदास आठवले.

कुटुंबातुन कुठलाही राजकीय वारसा नसलेले,स्वकर्तृत्वावर इतक्या मोठया पदावर पोचलेले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर बौद्ध समाजाचे भारत सरकार मध्ये मंत्री होणारे ,

: डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर बौद्ध समाजाचे भारत सरकार मध्ये मंत्री होणारे ,रामदास आठवले.

अनेक वर्ष संघर्ष करून ,संघर्ष नायक झालेले, गळ्यात झोळी,पायात स्लीपर ,केस वाढलेले, दाढी वाढलेली,वेळेवर जेवण मिळत नव्हते.जेवण्यासाठी सुद्धा ज्यांच्याकडे आणि ज्यांच्या कार्यकर्त्याकडे पैसे नसत ,वडापाव किंवा बुर्जी पाव खाऊन दिवस ढकलणारे ,पण निराश होऊन समाजकार्य न सोडणारे, ते रामदास आठवले.

महाराष्ट्राचे मोठे नेते शरद पवार यांनी,त्याच्यातील नेतृत्व गुण ओळखून ,आणि ज्याच्या मागे मोठा समाज आहे हे हेरून त्यांना आपल्या कडे आकृष्ठ करून त्यांना १९९० मध्ये अवघ्या ३१ व्या वर्षी महाराष्ट्र सरकार मध्ये केबिनेट मंत्री बनवून समाजकल्याण खात्याची जबाबदारी दिली आणि त्यांनी त्याचे सोने केले.दलितांवरील अन्याय दूर करण्याचे प्रयत्न केले, अदिवासी कल्याण केले, वसतिगृहात सुधारणा केल्या,गायरान जमिनी मिळवून दिल्या, बेरोजगाराना मिळणाऱ्या कर्जात शिथिलता आणली.आणखी बरीच कामे केली, ते नामदार रामदास आठवले.

आपल्या समाजाची ताकद कमी आहे.आपला राजकीय टक्का कमी आहे

आपण स्वबळावर कुठेच सत्तेत येऊ शकत नाहीत. साध्या ग्रामपंचायत मिळवू शकत नाहीत. हे हेरून कोणाशी तरी युती करणे आवश्यक आहे.हे समजून काँग्रेस या मोठया पक्षाशी युती करून ,मुंबईचे महापौर पक्षाला मिळवून देणारे, आपल्या सोबत असणाऱ्या प्रामाणिक आणि योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना मंत्रिपद मिळवून देणारे, आमदारकी मिळवून देणारे नेते ,रामदास आठवले.

त्यांच्या सोबत राहून मोठी मोठी पदे भोगून स्वार्थ साधल्या नंतर त्यांच्या पासून वेगळे होऊन नवीन रिपब्लिकन गट साधणारे आणि रिपब्लिकन गटात वाढ करणाऱ्या अनेक नेत्यांशी आजही सामंजस्याने वागणारे, कोणाबद्दल मनात कटुता न ठेवणारे नेते, रामदास आठवले. पहिल्यांदा मंत्री झाले तेंव्हा कार्यकर्त्यानी त्यांना कपडे दिले असे सामान्यातील सामान्य नेतृत्व ,रामदास आठवले.

काँग्रेस बरोबर युती करून रिपब्लिकन चार खासदार निवडून आणून इतिहास घडवणारे नेते ,रामदास आठवले.

आपल्या सामान्य कार्यकर्त्यांच्या सुखदुःखात वेळात वेळ काढून सहभागी होणारे, हमखास त्याच्या घरी जाऊन भेट देणारे नेते,आवश्यक असल्यास कार्यकर्त्यास मदत करणारे, दलित नेत्यांपैकीच नाही तर सर्व नेत्यांमध्ये सगळ्यात जास्त प्रवास केलेले, कार्यकर्त्याशी नाळ जोडलेले, सामान्य कार्यकर्त्यांशी सुद्धा अदबीने वागणारे,आयुष्यातील महत्वाचे क्षण कार्यकर्त्यांना देणारे नेते, रामदास आठवले.

१२व्या लोकसभेत (१९९८)उत्तर मध्य मुंबईतून पांढरी दाढीवाले आठवले विरुद्ध काळी दाढीवाले आठवले या लढतीत काळी दाढी वाले आठवले यांनी बाजी मारली आणि खासदार झाले.

१३ व्या लोकसभेत(१९९९) पंढरपूर मतदार संघातून सात वेळा निवडून आलेल्या संदीपन थोरात याना पराभूत करून निवडून आलेले खासदार.

१४ वि लोकसभा(२००४)परत निवडून आले आणि वाहतूक पर्यटन आणि संस्कृती या समितीत सदस्य झाले.

१९९९ सदस्य कॉन्सलटीव्ह कमिटी,युनायटेड मिनिस्ट्री ऑफ युथ, अफैर्स अँड स्पोर्ट्स,

२००७ सदस्य स्थायी समिती, लेबर

२००८ सदस्य, फाईनन्सिल कमिटी ऑफ इसटीमेट्स

२०१४ राज्यसभा सदस्य

२०१६ केंद्रीय मंत्री (भारत सरकार) समाजकल्याण

झाले ते रामदास आठवले

१९९८ -९९मध्ये काँग्रेस सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत राहिले.

२००९ च्या शिर्डी मतदार संघात पराभूत झाले.सुरक्षित मतदार संघात त्यांचा पराभव मुद्दाम केला गेला याची खात्री असल्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडली आणि वेगवेगळे पक्ष घेऊन 'रिडोलास ' स्थापन केली ही सेना बीजेपी,काँग्रेस राष्ट्रवादी यांच्या विरोधात होती. पण तिला यश आले नाही.

, मग सेनेबरोबर गेले.मुंबई महापालिका लढवली पण यश आले नाही. सेनेने झुलत ठेवले.त्यांच्या ताकदीचा अपमान केला.सेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांचे स्वीय सहायक आणि मित्र अनिल देसाई याना राज्यसभेवर पाठवले गेले.सगळी मीडिया म्हणत होती .रामदास आठवले याना शिवसेना राज्यसभेवर पाठवेल पण तसे झाले नाही.त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत सेनेची साथ सोडून बीजेपी सोबत गेले.संपूर्ण भारतात बीजेपीचे २८२ सदस्य निवडून आले.महाराष्ट्र मधून युतीचे ४२ सदस्य निवडून आले.यात रामदास आठवले यांची ताकद होती.हे ओळखून ज्यांना बीजेपीने राज्यसभेवर घेऊन २०१६ मध्ये मंत्री बनवले, ते रामदास आठवले.

हौसाबाई व बंडू आठवले यांच्या पोटी गरीब कुटुंबात ,२५ डिसेंम्बर १९५९ रोजी जन्मलेले ,

समाजासाठी शिक्षण अर्धवट सोडलेले, कुठलाही राजकीय वारसा नसताना पुढे पुढे जाणारे,मोठी महत्व आकांक्षा असलेले,विशेष म्हणजे दूरदृष्टी असलेले नेतृत्व म्हणजेच रामदास आठवले

मला वाटते,इतकी माहिती पुरेशी आहे.'कोण रामदास आठवले?'म्हणून विचारणाऱ्यांसाठी.

कडू डोस

एखाद्या व्यक्तीचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय त्याच्या विषयी मत व्यक्त करणे चुकीचेच आहे.किंवा सगळे काही माहीत असूनही त्याची अवहेलना करणे चुकीचे आहे.

आपण त्यांच्या जवळपासही पोहचू शकत नाही अश्यानी उगीच जीभ टाळ्याला लावण्याचा प्रयत्न करू नये.. साहेब परत तिसऱ्यांदा मंत्रीपद शपथविधी घेतल्यामुळे. जो आनंद समाजातील लोकांना झाला हे शब्दात व्यक्त करू शकत नाही सातत्याने मानव जातीच्या कल्याणासाठी आपण करत असलेल्या कामाबद्दल जेवढे कौतुक करावे तेवढं कमीच आहे यापुढे सुद्धा आपल्या हातून आपल्या समाजहितासाठी नेहमी प्रमाणे काम होते राहावे ..... मंत्री पद विराजमान झाल्यामुळे आपला खूप खूप अभिनंदन पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा ...

**अविनाश सोपान गायकवाड, पुणे**

## ज्येष्ठ मंत्र्यांची खाती..

प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे एकवटण्यात आली आहेत.

पूर्वीच्या सरकारमध्ये नरेंद्रसिंह तोमर या मध्यप्रदेशातील नेत्याकडेच कृषिमंत्रालय होते. शेतकऱ्यांच्या प्रश्र्नांचा पंजाब, हरियाणा आणि पश्र्चिम उत्तर प्रदेशमध्ये भाजपला फटका बसल्याच्या पार्श्र्वभूमीवर चौहान यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आल्याचे मानले जात आहे.

रेल्वे, माहिती-तंत्रज्ञान ही दोन्ही मंत्रालये अश्र्विनी वैष्णव यांच्याकडे कायम राहिली असून माहिती-प्रसारण हे आणखी एक महत्त्वाचे खातेही त्यांच्याकडे देण्यात आले आहे. पायाभूत विकासाशी निगडीत तीन खाती वैष्णव यांच्याकडे असतील. यातून त्यांच्यावर मोदींनी दाखवलेला विश्र्वास स्पष्ट होतो.

## मोदींच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्राचा वाटा

नवी दिल्ली : मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममधील खातेवाटप जाहीर झाले आहे. त्यात महाराष्ट्राच्या वाट्याला मिळालेली खाती- कॅबिनेटमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे रस्ते आणि परिवहन वाहतूक मंत्रालय, पीयूष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि उद्योग खाते, स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे आयुष आणि आरोग्य, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे नागरी उड्डाण आणि सहकार, रक्षा खडसे क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री, रामदास आठवले सामाजिक न्यायमंत्री. मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील २ खासदारांना कॅबिनेटमंत्री करण्यात आले आहे. तर ४ खासदारांना राज्यमंत्रिपद देण्यात आले आहे. यामध्ये एक स्वतंत्र प्रभार राज्यमंत्रिपद आहे.महाराष्ट्रातून नितीन गडकरी आणि पीयूष गोयल यांना केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे. तर रामदास आठवले, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांना राज्यमंत्रिपद देण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# रेशन मालाचे खरे लाभार्थीच रेशनपासुन वंचित; गोरगरीबांचे रेशन कार्ड लिंक करुन रेशन माल पुरवठा सुरु करा : श्रीनिवास उपळकर

**पंढरपुर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शासनाकडुन पुरवठा करण्यात येणार्या रेशन मालाचे खरे लाभार्थीच रेशन मालापासुन वंचित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असुन गोरगरीब अनेक लाभार्थ्यांचे रेशन कार्डच पुरवठा विभागाने लिंक केलेले नसल्याने अशा लाभार्थ्यांच्या हक्काचा रेशन माल दुसरेच अनेकजण ढापत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे ज्या गोरगरीब नागरिकांचे रेशन कार्डची लिंक जोडलेली नाही त्यांचे रेशन कार्ड लिंक करुन त्यांच्या हक्काचा रेशन माल त्यांना मिळण्याची तरतुद करावी अशी मागणी आम्ही एका निवेदनाद्वारे पंढरपुरचे पुरवठा अधिकारी श्री.नाईक यांच्याकडे केली असल्याची माहिती शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवासेना शहर प्रमुख श्रीनिवास उपळकर यांनी दिली आहे.




पंढरपुर शहरातील अनेक झोपडपट्टी भागातील रहिवाशांचे रेशन कार्ड पुरवठा खात्याकडुन आधार ला लिंक केलेले नसल्याने त्यांना रेशन माल मिळत नाही. ही बाब समोर आल्यानंतर आम्ही अशा अनेक गोरगरीब रहिवाशांना सोबत घेऊन पुरवठा विभागात गेलो, पुरवठा अधिकारी नाईक यांची भेट घेतली व उपलब्ध कागदपत्रं दिली. तेंव्हा पुरवठा अधिकार्यांनी यांचे उत्पन्नाचे दाखले आणा असे सांगितले. वास्तविक पुर्वी या सर्वांना रेशन माल मिळत होता परंतु आता रेशन दुकानदारांकडुन तुमचे रेशन कार्ड लिंक केले नसल्याने तुम्हाला रेशन माल मिळणार नाही असे सांगत आहेत. या सर्वांचे रेशनकार्ड पिवळे व केसरी आहे, एवढा पुरावा हे लाभार्थी असण्यासाठी पुरेसा आहे. असे पुरवठा अधिकारी यांच्या निदर्शनास आम्ही आणुन दिले आहे व यांच्यासह पंढरपुरातील रेशन मालाच्या लाभापासुन वंचित असलेल्या सर्वांचे रेशन आधार ला लिंक करण्याची स्वतंत्र मोहिम राबवुन खर्या लाभार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी केली असल्याची माहिती ही यावेळी श्रीनिवास उपळकर यांनी दिली आहे.

महा ई-सेवा केंद्रांमधुन रेशनकार्ड ऑनलाईन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अवाजवी पैशाची मागणी होत आहे. त्यामुळे रेशनकार्ड ऑनलाईन करुन घेण्यासाठी पंढरपुर पुरवठा विभागामार्फत स्वतंत्र मोहीम राबवण्यात यावी. अशी मागणीही श्रीनिवास उपळकर यांनी केली आहे. यावेळी युवासेना विभागप्रमुख विशाल डोंगरे, राजेश नेमाडे, अमर उपळकर, स्वप्नील वाघमारे आदी उपस्थित होते.

# आमदार शहाजी बापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयात २०२ कार्यकर्त्यांची रक्तदान शिबिर संपन्न

**सांगोला/दैनिक यशसिध्दि न्यूज**

विद्यार्थी संघटनेचे तालुकाप्रमुख अजिंक्य राणा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध रक्तदान शिबिर संपन्न शिवसेना विद्यार्थी संघटनेचे सांगोला तालुका प्रमुख अजिंक्यराणा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत सांगोला येथील आमदार शहाजीराव पाटील यांच्या संपर्क कार्यालयातील रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात २०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून अजिंक्यराणा शिंदे यांना वाढदिवसानिमित्त अनोख्या शुभेच्छा दिल्या




शिवसेना प्रणित विद्यार्थी संघटनेचे सांगोला तालुकाप्रमुख अजिंक्यराणा शिंदे यांच्या २१ व्या वाढदिवसानिमित्त शिवसेना युवा सेना व विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिराची आयोजन करण्यात आले होते सध्या रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात भासत असल्याने रुग्णावर उपचार करण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांना दाखल करावी लागत आहे अशा परिस्थितीत रुग्णसेवेला प्राधान्य देत अजिंक्यराणा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार शहाजी बापू पाटील यांच्या संपर्क कार्यालयात भव्य अशा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते व त्या रक्तदान शिबिरात २०२ कार्यकर्त्यांनी रक्तदान करीत अजिंक्यराणा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला आहे

या रक्तदान शिबिरात बँकेच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले वरील बँड बँकेच्या वतीने रक्तदात्यांना प्रमाणपत्र ही देण्यात आले व रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिवसेनेचे युवा नेते दिग्विजय पाटील युवा सेनेचे जिल्हाप्रमुख सागर पाटील माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे युवासेना तालुकाप्रमुख गुंडा दादा खटकाळे माजी नगरसेवक सोमेश यावलकर विजय शिंदे रमेश शिंदे गुरुजी यांच्यासह शिवसेना युवासेना आणि विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी नंतर वागदरीत जल्लोष



**वागदरी/एस.के.गायकवाड :**

सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने मिरवणूक काढून जल्लोष साजरा केला. नुकतच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत अनेक आश्र्चर्य कारक निकाल लागलेअसले तरी ही भाजपा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने दि.०९ जून २०२४ रोजी झालेल्या शपथविधी सोहळ्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या शपतविधी नंतर वागदरी ता.तुळजापूर येथे भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) रिपाइं (आठवले) सह महायुतीच्या कार्यकर्त्यानी फटाक्यांची आतिषबाजी करून हागलीच्या कडकडाटात गावातून मिरवणूक काढून मोठ्या उत्साहाने जल्लोष साजरा केला.या प्रसंगी भाजपा सह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान ;अक्कलकोटमध्ये जल्लोष

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

देशात पुन्हा एकदा एनडीएचे सरकार आल्याबद्दल आणि पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांची निवड झाल्याबद्दल अक्कलकोट शहर आणि तालुका भाजपतर्फे रविवारी जल्लोष करण्यात आला. मोदी यांनी राष्ट्रपती भवनात शपथ घेतल्यानंतर बस स्टँड परिसरात भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली आणि मोदी यांच्या विजयाची खूण दाखवत जयघोष केला. यावेळी पेढे आणि बुंदी लाडू वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यानंतर अक्कलकोट भाजप कार्यालयापुढे देखील आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजप तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांच्या प्रमुख उपस्थितीत विजयी जल्लोष करण्यात आला. यावेळी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष मल्लिनाथ स्वामी,



यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, विलास गव्हाणे, अंकुश चौगुले, केदार माळशेट्टी, बाळा शिंदे, आप्पासाहेब पाटील, अप्पू बिराजदार, राजू बंदीछोडे, प्रवीण शहा, दयानंद बिडवे, प्रभाकर मजगे, बंटी राठोड, नागराज कुंभार, नन्नू कोरबू, राहुल ढोबळे, सुनील गवंडी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामपंचायत सदस्य लहुराज घुटूकडे यांच्या वाढदिवसानिमित्त १०० आब्यांच्या रोपांचे वाटप



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य लहुराज घुटूकडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संकल्पनेतून वॉर्ड नंबर ५ मध्ये १०० उच्च प्रतिच्या आंब्याच्या रोपांचे प्रति कुटूंब २ आंब्याच्या रोपांचे वाटप करण्यात आले. अशा प्रकारे सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरा करण्यात आला.वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडलेला आहे त्यामुळे वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून आपण समाजाचे काही तरी देणे लागतो या हेतूने वृक्षारोपण करून निसर्गाचा समतोल पुर्ववत होण्यासाठी माझ्या वतीने हा छोटासा उपक्रम राबवून वाढदिवस साजरा केला असल्याचे ग्रामपंचायत सदस्य लहुराज घुटूकडे यांनी सांगितले.

यावेळी गुरसाळे ग्रामपंचायतीचे सरपंच दिपक शिंदे, उपसरपंच अनिल खरात, नागनाथ खंडागळे, राजेंद्र घुटूकडे, हरिभाऊ देशमुख, मारूती जाधव, लिंगेश्र्वर माने, बंडू चव्हाण, रोहित देशमुख, अमर शेजवळ यांच्यासह ग्रामस्थ आदि उपस्थित होते.

# पंढरपूर तालुक्यात चार दिवसांत सरासरी १२७ मि.मी.पाऊसाची नोंद

**पंढरपूर/प्रतिनिधी**

जून महिन्याच्या सुरूवातीस यंदा पर्जन्यराजा पंढरपूर तालुक्यात दररोज हजेरी लावत आहे. मागील चार दिवस सतत पाऊस होत असून शनिवारी रात्रीपर्यंत तालुक्यात एकूण ३३३ तर सरासरी ३७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. या महिन्यात १२७ मि.मी. हून अधिक पर्जन्यमान नोंदले गेले आहे. शनिवारी सायंकाळी व रात्री दमदार पावसाने हजेरी लावली असून सर्वाधिक पाऊस तुंगत मंडळात ८७ मि.मी. इतका नोंदला गेला आहे. पंढरपूर शहरात ७३ मि.मी. पावसाची नोंद झाली असून यापाठोपाठ पुळूज ६७, चळे ६३, कासेगाव ३४, करकंब २८, भंडीशेगाव २७, पटवर्धन कुरोली २६ मि.मी. अशा पावसाची नोंद आहे. पंढरपूर शहराला पुन्हा जोरदार पावसाने झोडपून काढल्याने सखल भागात पाणी साठले होते. तसेच प्रदक्षिणा मार्गासह अनेक रस्ते जलमय होते. तालुक्यात सहा जूनपासून दररोज पाऊस पडत आहे. तालुक्यात चार दिवसात सरासरी १२७ मि.मी. इतक्या पावसाची नोंद आहे.पंढरपूर शहरात चार दिवसात २४४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. ६ जून रोजी ३० मि.मी., ७ रोजी १३१, ८ ला १० तर ९ जून ला ७३ मि.मी. असा पाऊस झाला आहे. या पाठोपाठ तुंगत २०२, पुळूज १७९ व चळे मंडळात १६६ मि.मी. पावसाची नोंद आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने वातावरणात बदल होऊन उष्णता कमी झाली आहे. यंदा मे महिन्यातही अवकाळी व मान्सूनपूर्व पावसाच्या सरी चांगल्याच कोसळल्या होत्या. १३, १७, २१, २२, २३ व २७ मे रोजी कमी अधिक स्वरूपात तालुक्यात पावसाने हजेरी लावली होती. यंदा प्रथमच चार दिवसात महिन्याच्या सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. अजूनही दोन दिवस या भागात पाऊस पडेल, असा अंदाज आहे. यंदाचा उन्हाळा अत्यंत तीव्र होता व त्यातच २०२३ च्या पावसाळ्यात कमी पर्जन्यमानामुळे भूगर्भातील पाणीपातळी ही कमालीची घटली होती. मे महिन्यात अनेक विहिरी तसेच बोअर कोरडे पडले होते. यातच मान्सूनपूर्व व यानंतर हा सलग चार दिवस पाऊस झाल्याने पाणीटंचाईत दिलासा मिळाला आहे.

# अयोध्येतील महाराष्ट्र सदनासाठी उत्तर प्रदेश सरकारकडून भूखंड मंजूर : सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

उत्तर प्रदेश सरकारने अयोध्येत महाराष्ट्र सदन उभारण्यासाठी २.३२७ एकरचा भूखंड मंजूर केला आहे. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या दर्शनासाठी महाराष्ट्र राज्यातील अतिथी, भाविक व पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी उभारण्यात येणारे हे महाराष्ट्र सदन येत्या २ वर्षांत पूर्ण होणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.



उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजन विभागाच्यावतीने अयोध्या येथे राष्ट्रीय राजमार्ग, शरयू नदीजवळ ग्रीन फिल्ड टाऊनशिप विकसित करण्यात येत आहे. या ठिकाणी हा भूखंड उत्तर प्रदेश सरकारने मंजूर केला आहे. भूखंड अधिग्रहित करण्यासाठी ६७.१४ कोटी रुपयांची तरतूद सार्वजनिक विभागाच्यावतीने करण्यात आली आहे. या इमारतीचे बांधकाम, विद्युतीकरण व अन्य सोयी सुविधांसाठी सुमारे २६० कोटीच्या निधीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याची माहिती, काल सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी या प्रस्तावित जागेची अयोध्या येथे पाहणी करतेवेळी दिली. यावेळी विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर-पाटणकर, सचिव सदाशिव साळुंखे, सचिव संजय दशपुत्रे, मुख्य अभियंता रणजीत हांडे यांच्यासह उत्तर प्रदेशच्या नियोजन विभागाच्या आवास योजनेचा अभियंता पी.के.सिंग, अभिषेक वर्मा, विनय चव्हाण आदी अधिकारी उपस्थित होते.

अयोध्या श्रीराम जन्मभूमी मंदिरापासून सुमारे ७.५ कि.मी. तर अयोध्या धाम रेल्वे स्टेशनपासून ४.५ कि.मी. अंतरावर हे प्रस्तावित महाराष्ट्र सदन उभारण्यात येणार आहे. अयोध्येत नव्याने बांधण्यात आलेल्या महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळापासून सुमारे ११ कि.मी. अंतरावर हे महाराष्ट्र सदन उभे राहणार आहे, अशी माहिती मंत्री श्री. चव्हाण यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सरकारने अयोध्येत महाराष्ट्र सदन बांधण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला होता. त्यासाठी यापूर्वी अयोध्येत प्रत्यक्ष स्थळी जाऊन जागाही निश्र्चित केली होती. त्याच अनुषंगाने काल सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यामार्फत या २.३२७ एकर जागेच्या व्यवहाराचा पहिला टप्पा म्हणून उत्तर प्रदेश सरकारला १०% रक्कम अदा केली. पुढील दोन महिन्यात जागेचा पूर्ण मोबदला अदा करून लवकरात लवकर भक्त सदन बांधण्याची कार्यवाही सुरु होईल, असेही मंत्री श्री. चव्हाण यांनी सांगितले.

# मंगळवेढ्यात मृग नक्षत्राच्या पावसाची दमदार हजेरी

मंगळवेढा/प्रतिनिधीः शहरासह तालुक्यात वादळी वारे, विजेच्या कडकडाटासह मृग नक्षत्राचा पाऊस जोरदार बरसला आहे. यामुळे काही ठिकाणी रस्ते जलमय झाले असून झाडे उन्मळून पडल्याच्या घडना घडल्या आहेत. दरम्यान, हा पाऊस खरीप पेरणीस उपयुक्त मानला जात आहे. वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर जास्त असल्याने अनेक ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला होता.

तो शनिवारी उशिरापर्यंत पूर्ववत झाला नव्हता. यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना सहन करावा लागला आहे. दरम्यान, सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मंगळवेढा -सोलापूर रोडवर असणाऱ्या हॉटेलसमोरील गाड्या पार्किंगशेड, पानटपऱ्या व लहान दुकानांवरील पत्रे उडून गेले आहेत. शनिवारी सायंकाळी मृग नक्षत्राच्या सरी बरसण्यास सुरूवात झाली. रात्री उशिरापर्यंत त्या कोसळत होत्या. काळ्या शिवारात चांगली ओल झाली आहे. जोरदार पावसामुळे बळीराजा सुखावला आहे. आता खरिपाच्या पेरणीला वेग येणार आहे.

# राज्यातील पाऊस, खते, बी-बियाणे, टँकर, पीक कर्ज, पाणीसाठ्याचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांकडून घेतला आढावा

## प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याबाबत दक्षता घ्या : उपमुख्यमंत्री

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यात पुणे विभागासह कोकण प्रदेशात चांगला पाऊस झाला आहे, तर अन्य भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात समाधानकारक पाऊस अपेक्षित आहे. पावसाच्या आगमनानंतर शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. त्यामुळे खते-बियाण्यांच्या अभावी कुठेही पेरण्यांना विलंब होता कामा नये. त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे, खतांचा पुरवठा करा. तसेच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज राज्यातील पाऊसमान, खते, बी-बियाणे पुरवठा, पीक कर्ज वितरण, टँकरची स्थिती, धरणांतील पाणीसाठा व विसर्गाचे नियोजन, पूर नियंत्रण, चारा उपलब्धता याबाबत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आढावा घेतला. बैठकीला महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, आपत्ती व्यवस्थापनचे संचालक लहूराज माळी, कृषी विभागाचे उपसचिव श्री. चांदवले आदी उपस्थित होते. तसेच पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अमरावती विभागीय आयुक्त निधी पांडे, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना-बिदरी, छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपायुक्त जगदीश मनियार, नाशिक विभागाच्या उपायुक्त राणी ताटे, कोकण विभागाचे उपायुक्त



संजीव पलांडे, कृषी सहसंचालक रावसाहेब भाबडे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पहिल्याच पावसात पुणे शहरातील विविध भागात पाणी साचल्याचे दिसून आले. महापालिकेने याबाबत त्वरित आवश्यक उपाययोजना कराव्यात. मोठ्या पावसात पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. राज्यात काही भागात १०० मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडला आहे. अशा परिस्थितीत वापसा आल्यानंतरच पेरण्यांचे नियोजन करावे. तसेच पुरेसा पाऊस पडला नसलेल्या ठिकाणी चांगला पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी, यासाठी कृषी विभागाच्या समन्वयाने जनजागृती करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडणार असल्यामुळे धरणांमधील पाणी सोडण्याचे काटेकोर नियोजन करावे. आंतरराज्यीय धरणांवर जलसंपदा विभागाने आपला समन्वय अधिकारी नियुक्त करावा, त्याच्या माध्यमातून योग्य वेळी पाण्याच्या विसर्गाबाबत नियोजन करावे. पाण्याचा फुगवटा निर्माण होऊन शहरे, गावांत पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी. आलमट्टी धरणाच्या पाण्यामुळे कोल्हापूर शहरात पुराची समस्या येऊ नये, यासाठी आतापासून नियोजन करावे. तसेच मेडिगट्टा, गोसीखुर्द धरणाबाबतही सतर्क राहून गडचिरोली जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.पाऊसमान चांगले असल्यामुळे पाणी तुंबणे, अनियंत्रित विसर्गामुळे पूर येणे आदींबाबत यंत्रणांनी काळजी घ्यावी. पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पूर्वसूचना देऊन सतर्क करावे. अशा परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याचा, वेळेवर मदत व पुनर्वसनाचे सर्व उपाय योजण्याचा प्रयत्न करावा. जलसंपदा विभागाने धरणांमधील पाणी सोडण्याबाबत योग्य ते नियोजन करावे. याबाबत अन्य यंत्रणांशी समन्वय ठेवावा. शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध होईल याबाबत बँकांना सूचना द्याव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.विभागीय आयुक्तांनी आपआपल्या विभागातील पाऊस, धरणातील जलसाठा, खरीप हंगामाचे नियोजन, तर पुणे विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी यासोबतच आषाढी वारीच्या नियोजनाबाबत माहिती दिली. आषाढी वारीसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

# ए.जी.पाटील तंत्रनिकेतन मध्ये मॉनिटरिंग ॲपची निर्मिती

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ए.जी.पाटील तंत्रनिकेतनच्या संगणक विभागातील श्रेयस जाधव, चिन्मय जाधव, वैभव धरणे या विद्यार्थ्यांनी प्रकल्प प्रमुख नागेश गोडेन यांच्या मार्गदर्शनाखाली मॉनिटरिंग दि ॲग्रो सिस्टीम युजिंग डीप लर्निंग हे मोबाइल ॲप्लिकेशन तयार केले आहे.




'मॉनिटरिंग दि ॲग्रो सिस्टीम युजिंग डीप लर्निंग' हे एक मल्टी-सर्विस मोबाइल ॲप्लिकेशन आहे. या ॲपद्वारे शेतकरी, खासगी ट्रान्सपोर्टर्स व सामान्य वापरकर्ते एकमेकांशी जोडले जाऊ शकतात आणि विविध सेवांचा लाभ घेऊ शकतात. ह्या ॲपचा मुख्य उद्देश प्रत्येक शेतकऱ्याला अद्ययावत तंत्रज्ञानाशी जोडणे हा आहे, ज्यामुळे शेतकरी व तंत्रज्ञान एकत्र येऊन नव्या भविष्याची पाया रचू शकतील. या ॲपमध्ये प्रत्येक शेतकरी एकमेकांच्या शेतीच्या पद्धती आणि अद्ययावत तंत्रज्ञान शेअर करू शकतो. या ॲपमध्ये ट्रान्सपोर्टची सुविधा देखील आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी एक वर्चुअल बोट तयार केला आहे, ज्यामुळे शेतकरी सध्या चालू असलेल्या परिस्थितीबद्दल माहिती मिळवू शकतात. या ॲपमध्ये इतर सेवाही उपलब्ध आहेत. शेतकरी स्वतःच्या पिकांचा भाव ठरवून या ॲपमध्ये विक्रीही करू शकतो. तसेच इतर शेतकऱ्यांचेही पीक विकत घेऊ शकतो. या प्रकल्पासाठी ॲप बनवताना फ्रंट- एंडमध्ये दचङ आणि गुगल मटेरियल थीम्सचा वापर केला आहे, तर बॅकएंड डेटाबेससाठी गुगल फायरबेस वापरण्यात आले आहे. त्यामुळे स्क्रीन स्टाइलिंग आणि लूक आणि फीलचे व्यवस्थापन सोपे झाले आहे. ह्या ॲपचा वापर करून शेतकऱ्यांना एकमेकांशी संपर्क आणि शेती क्षेत्रातील सोयीसुविधा प्रदान केल्या जातात, अशी माहिती प्रा. नागेश गोडेन यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष एस.ए.पाटील, प्राचार्य डॉ.एम.ए.चौगुले,उपप्राचार्य प्रा.एस.के.मोहिते आणि विभागप्रमुख प्रा.टी. एल. पाटील यांनी या प्रकल्पातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी पंपाची व्यवस्था करावी : उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार या पावसाळ्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस अपेक्षित आहे. त्यामुळे प्रशासनाने पाणी साचणे, पुराचे पाणी, नाले तुंबणे आदी ठिकाणे शोधून तेथे उपाययोजना कराव्यात. तसेच महानगरपालिका, नगरपालिका यांनी पाणी साचणाऱ्या ठिकाणी पाण्याचा उपसा करण्यासाठी पंपाची व्यवस्था करावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी आज दिले.

मंत्री महोदयांच्या शासकीय निवासस्थानी ठाणे जिल्हा मान्सुनपूर्व आढावा बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी माहिती दिली. तसेच अन्य प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

नाल्यांची साफ-सफाई करण्यात आली आहे. मात्र मोठा पाऊस झाल्यास नाल्यांमध्ये कचरा अडकून पाणी तुंबण्याची समस्या निर्माण होवू शकते. या पाण्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होवून नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागू शकते. नाल्यांच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष ठेवावे. धोकादायक इमारतींमधील नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करण्याची आवश्यकता भासल्यास तात्पुरती निवारा केंद्र सुविधांनी सज्ज असावी. या ठिकाणी पिण्याचे पाणी, वीजेची सुविधा असावी, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्री श्री. देसाई पुढे म्हणाले, नागरी व ग्रामीण भागातील रूग्णालयांमध्ये औषधसाठा पुरेसा उपलब्ध करून ठेवावा. साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने सतर्क रहावे. साथरोगावरील औषधांची उपलब्धता निश्चित करावी. गृह विभागाने प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये 'इमरजन्सी हेल्पलाईन क्रमांक'ची सुविधा सुरू करावी. पूर किंवा पावसाशी निगडीत घटनेशी संबंधित दूरध्वनी किंवा सूचना आल्यास, तात्काळ संबंधित यंत्रणेला माहिती देवून गरजू नागरिकांना मदत द्यावी. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेते यांना क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्याकरिता कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या सुचनेनुसार आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सप क्रमांक (केवळ संदेश पाठविण्याकरिता) ९८२२४४६६५५ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

खरीप हंगामात बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा पुरवठा वेळेत तसेच गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात होणे अत्यावश्यक आहे. यासाठी कृषी विभागाच्या टोल फ्री (तोंडी तक्रार नोंदविण्याकरिता) १८००२३३४००० क्रमांकावरही संपर्क करता येईल. तसेच अडचण किंवा तक्रार controlroom.qc.maharashtra@gmail.com या ई-मेलवरही नोंदवता येईल.संबंधितांनी व्हॉट्सप, टोल फ्री भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेलवर अडचणी, निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिंकींग बाबत असलेल्या तक्रारी नोंदवताना, नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व अडचणी किंवा तक्रारीचा संक्षिप्त तपशिल द्यावा. अडचणीबाबत माहिती कोऱ्या कागदावर लिहून त्याचा फोटो व्हॉट्सप किंवा ई-मेलवर पाठवल्यास तक्रारींचे निराकरण करणे सोयीस्कर होईल.ज्या शेतकऱ्यांना व्हॉट्सपचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी वरील टोल फ्री क्रमांकावर संपर्क क्रमांकासह तोंडी तक्रारी नोंदवाव्यात. शेतकऱ्यांना त्यांच्या तक्रारी ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत नोंदवता येतील, असे कृषी संचालक विकास पाटील यांनी कळविले आहे.

# स्वेरीत ड्रोन टेस्ट बेंच विकसित; इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागाची भव्य कामगिरी

**पंढरपूर/प्रतिनिधी :**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागात ड्रोन टेस्ट बेंच विकसित करण्यात आला आहे.



इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागात अंतिम वर्षात शिक्षण घेणारे रोहन नवनाथ सुरवसे, सागर उमेश पाटील, सार्थक संजय लोखंडे आणि अमन अन्वरहुसेन शेख या विद्यार्थ्यांनी ड्रोन क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यातून हा ड्रोन टेस्ट बेंच विकसित करण्यात आलेला आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या दिशादर्शक नेतृत्वाखाली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, विभागप्रमुख डॉ. दीप्ती तंबोळी, प्रकल्प मार्गदर्शक डॉ. मोहन ठाकरे व प्रा. सागर कवडे यांच्या सहकार्याने रोहन सुरवसे, सागर पाटील, सार्थक लोखंडे आणि अमन शेख या विद्यार्थ्यांनी ड्रोनसाठी प्रगत टेस्ट बेंच यशस्वीपणे विकसित केला आहे. या ड्रोन टेस्ट बेंचच्या माध्यमातून ड्रोनची स्थिरता, वेग, पेलोड क्षमता आणि त्यासाठी आवश्यक बॅटरीची कार्य करण्याची क्षमता व त्याचा एकूण कालावधी आदी बाबी तपासल्या जाणार आहेत. ड्रोन सुरक्षितता आणि आपत्कालीन प्रतिसाद या बाबी देखील सुनिश्चित केल्या जाणार आहेत तसेच मोटर्स, प्रोपेलर्स, सेन्सर्स आणि कम्युनिकेशन सिस्टीमची चाचणी करण्यासाठी माहिती गोळा करून ड्रोन संदर्भातील भविष्य कालीन संशोधनासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील नवीन संकल्पना आणि त्या संदर्भातील यश संपादन करण्यासाठी स्वेरी मध्ये मोठ्या प्रमाणावर कार्य सुरु आहे. स्वेरीतील ड्रोन प्रकल्पातून नवनवीन संशोधनासाठी विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना प्रेरणा मिळत आहे. यावरून स्वेरीचे विद्यार्थी हे केवळ अभ्यासातच निपुण नसून ते ड्रोन तंत्रज्ञानात देखील अग्रेसर असल्याचे स्पष्ट होते. ड्रोन प्रकल्पाचे परीक्षक डॉ. बादलकुमार हे या निमित्ताने स्वेरीत उपस्थित होते. ड्रोन संदर्भात विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी केलेल्या कामगिरीमुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी सर्व सहभागी व प्रकल्पातील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# लिंगायत समाजातील गुणवंतांचा सत्कार



**सोलापूर/प्रतिनिधी:**

वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान व कांचन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वीरशैव लिंगायत समाजातील दहावी व बारावीमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालघर जिल्ह्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे होते. यावेळी कांचन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुदीप चाकोते, प्रतिष्ठानचे मार्गदर्शक सिद्धय्या स्वामी, डॉ. शैलेश पाटील, माजी पोलीस उपायुक्त दीपक आर्वे, सिद्धाराम चाकोते, केदार उंबरजे, माजी महापौर शोभा बनशेट्टी, श्रीशैल बनशेट्टी, राजशेखर हिरेहब्बू, प्रवीण तानवडे, डॉ. बसवराज सलगर, केदार बिराजदार, अप्पासाहेब मनगुळी, राचप्पा आरळीमार, विजय तंबाके, वीरेंद्र हिंगमिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी काशीनाथ भतगुणकी यांनी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी धनराज पांडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील करिअरसंबंधी असलेल्या विशेष संधी बाबत मार्गदर्शन केले. शिवाय उपस्थितांमधील दहावीमधील प्रथम तीन विद्यार्थी सानिका कारंडे, तन्वी मुकणे, श्लोक पाटील, ओम पाटील तसेच बारावीमधील प्रथम तीन विद्यार्थिनी तनवी कस्तुरे, आदिती वनारोटे, कांचन किणगी यांना प्रत्येकी अकराशे रुपये बक्षीस देऊन सन्मानित केले. प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकी जपत रवींद्र ऊर्फ प्रीती नागटिळक या तृतीयपंथी विद्यार्थ्याचा विशेष सत्कार केला. यावेळी वीरशैव लिंगायत समाजातील सुमारे ३०० विद्यार्थ्यांना मल्टीपर्पज डॉक्युमेंट फाईल व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश स्वामी यांनी केले. सोमा शरणार्थी यांनी स्वागत केले. शशिकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, सुनील शरणार्थी, अनिल वजीरकर, अशोक नागणसुरे, श्रीशैल बिराजदार, गुरू निंबाळे, पिंटू धुम्मा, प्रा. झाडे, सचिन कुलकर्णी, गिरी स्वामी, मनोज कोले, कैलास मेंगाने, सिद्धाराम बबलेश्वर, बाळासाहेब देशमुख, कैलास जेऊरे, राहुल भोगडे, सुनील धरणे, शिवानंद बल्लोळी व इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.